# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

डॉ.सुरेंद्र रा. काळबांडे
कुलसचिव

Phone No. : 0724-2258372
Fax No. : 0724-2258386
E-Mail - registrar@pdkv.ac.in


**महत्वाचे**

क्रमांक : बीएए/वा.वे./२०२१/२०९
दिनांक : १५ जुलै, २०२१

प्रति,

सर्व नियंत्रण अधिकारी
डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला

**विषय :** विद्यापीठ अधिनस्त प्रतिवेदन/ पुनर्विलोकन अधिकारी यांच्या दि. ०१ जुलै, २०२१ च्या वार्षिक वेतनवाढीबाबत...

**संदर्भ :** (१) विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएए/काअ/२०२०-२१/२०२१/६१, दि. १२ मार्च, २०२१
(२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. सीएफआर/१२११/प्र.क्र. २१७/१३, दि. १९/०५/२०१२
(३) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-१०१३/प्र.क्र. ५५/कोषा.प्र-५, दि. ०९/०७/२०१३
(४) वित्त विभागाचे परिपत्रक क्र. संकीर्ण-१०१३/प्र.क्र. ५५/कोषा.प्र-५, दि. १२/०९/२०१३

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, संदर्भाकिंत क्र. १ च्या परिपत्रकानुसार सन २०२०-२०२१ या वर्षातील कार्यमूल्यमापन अहवालाच्या प्रतिवेदनाचे व पुनर्विलोकनाचे काम विहित मुदतीत पार पाडण्यासंबंधी कळविण्यात आले होते. त्यानुसार विद्यापीठातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहून त्यांचे संस्करण करण्याची कार्यवाही दिनांक ३० जून पर्यंत पूर्ण होणे बंधनकारक आहे.

कार्यमूल्यमापन अहवाल (गोपनिय अहवाल) विहित वेळापत्रकानुसार लिहण्याची जबाबदारी पार न पाडणा-या प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिका-याची त्या वर्षातील दिनांक ०१ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ मंजूर न करण्याच्या सूचना संदर्भिय क्र. २ सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक तसेच संदर्भिय क्र. ३ व ४ च्या वित्त विभागाचे परिपत्रकांमध्ये देण्यात आल्या आहेत. तथापी कार्यमूल्यमापन अहवाल लिहणेबाबत सुचना निर्गमित करूनही व विहित कालावधी उलटूनही मोठया प्रमाणात कार्यमूल्यमापन अहवाल प्रलंबित असल्याचे दिसून येते.

करिता विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व प्रतिवेदन/ पुनर्विलोकन अधिकारी यांचे **दि. ०१ जुलै देय होणारी वार्षिक वेतनवाढ** मंजुर करतेवेळी संबंधित प्रतिवेदन/ पुनर्विलोकन अधिकारी यांनी **सन २०२०-२०२१ या वर्षाचे कार्यमूल्यमापन अहवाल लिहणेबाबत प्रतिवेदन/ पुनर्विलोकनाचे काम १०० टक्के पूर्ण केल्याची खात्री करुन** संबंधित अधिकारी यांचे वार्षिक वेतनवाढीस मंजुरी प्रदान करावी अन्यथा कार्यमूल्यमापन अहवाल विहित वेळापत्रकानुसार लिहण्याची जबाबदारी पार न पाडणा-या प्रतिवेदन व पुनर्विलोकन अधिका-याची दिनांक ०१ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढीस प्रतिवेदन/ पुनर्विलोकनाचे कार्य पूर्ण होईतोवर मंजुरी प्रदान करण्यात येवू नये.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

प्रतिलीपी :
कुलगुरु यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता.